24 JAN 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात १ पासून आंतरराष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागात 'ॲडव्हान्सेस इन केमिकल सायन्सेस' या विषयावरील तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे १ ते ३ फेब्रुवारी २०१८ या कालावधीत करण्यात आले असल्याची माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, परिषदेत रसायनशास्त्र विज्ञानातील प्रगती, आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरू असणारे संशोधन यांविषयी चर्चा करण्यात येणार असून या आंतरराष्ट्रीय परिषदेस देश-विदेशांतून तीनशेहून अधिक संशोधकांसह नामवंत आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञ सहभागी होणार आहेत.



परिषदेस नामवंत डॉ.डी.पी. पांडा (क्लेम्सन विद्यापीठ, अमेरिका), प्रा. शेषनाथ भोसले (ऑस्ट्रेलिया), प्रा. पाँग वे फाँग, डॉ. शिंग व्हॉं झिंग, प्रा. लिंग यॉंग चेन (तैवान), डॉ. लिन डेनॅनी (स्कॉटलंड), प्रा. मिंग्स लाँग (चीन), प्रा. डिऑग सोहन (दक्षिण कोरिया) तसेच भाभा एटोमिक रिसर्च सेंटर (बीएआरसी) येथील डॉ. जालीधर याखमी, डॉ. भास्कर साठे (औरंगाबाद), डॉ. संजीव कट्टी (रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड), प्रा. बादल मंडल (व्हीआयटी, चेन्नई), प्रा. प्रेमकुमार सी.ई. (सी. आर.आय., चेन्नई), प्रा. पी.पी. वडगावकर (एनसीएल, पुणे) आदी प्रख्यात शास्त्रज्ञ या परिषदेत सहभागी होऊन मार्गदर्शन करणार आहेत. सहभागी संशोधकांव्यतिरिक्त एम.एस्सी. करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या परिषदेत मुक्त प्रवेश असेल, असेही कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले.

समन्वय समितीच्या वतीने माहिती देताना डॉ. अनिल घुले यांनी सांगितले की, १ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता वि.स. खांडेकर भवन येथे कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होईल. रिलायन्स इंडस्ट्रीजचे वरिष्ठ उपाध्यक्ष डॉ. कट्टी यांचे यावेळी बीजभाषण होईल. तैवानच्या नॅशनल त्सिंग हुवा विद्यापीठाचे प्रा. लिंग यॉंग चेन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. २ फेब्रुवारी रोजी ऑस्ट्रेलिया, तैवान, येथील नामवंत शास्त्रज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने होतील. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली पारितोषिक वितरण होईल.

पत्रकार परिषदेस डॉ. अनिल घुले, डॉ. सागर डेळेकर, डॉ. एस. एस. कोळेकर आदी उपस्थित होते.

24 JAN 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठाच्या रसायन अधिविभागातर्फे 'अॅडव्हान्सेस इन केमिकल सायन्सेस' या तीनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद दि. १ ते ३ फेब्रुवारी या कालावधीत होणार आहे. परिषदेत रसायनशास्त्र विज्ञानातील प्रगती, चालू घडामोडींवर चर्चा होणार आहे. यासाठी देशासह जगभरातून तज्ज्ञ संशोधक उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

रसायनशास्त्रातील संशोधन, जागतिक स्तरावरील घडणाऱ्या संशोधनातील घडामोडी आणि समाजोपयोगी संशोधनास



चालना मिळावी या उद्देशाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भवन येथे ही परिषद पार पडणार आहे. यासाठी जगभरातून ३०० हून अधिक संशोधक उपस्थित राहणार आहेत. परिषदेच्या पहिल्या दिवशी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते या परिषदेचे उद्‌घाटन होणार आहे, तर मुंबईतील रिलायन्स इंडस्ट्रिजचे डॉ. संजीव कट्टी आणि तैवानमधील नॅशनल सिंग हुवा विद्यापीठाचे प्रा. लिंग योग चेन हे प्रमुख पाहुणे असणार आहेत.

परिषदेत अमेरिकेच्या क्लेसमन विद्यापीठाचे डॉ. डी. पी. पांडा, ऑस्ट्रेलियाचे शेषनाथ भोसले, तैवानचे प्रा. लिंग यॉन चेन, पॉग वे फॉग, डॉ. शिंग व्हॉ झिंग, स्कॉटलंड येथील डॉ. लिन डेनॅनी, चीन येथील मिंग्स लॉग, साऊथ कोरिया येथील प्रा. डिऑग सोहन, भाभा ऑटोमिक रिसर्च सेंटरचे डॉ. जालिंदर याखमी, औरंगाबादचे डॉ. भास्कर साठे, बादल मंडल, प्रेमकुमार आणि पी. पी. वडगावकर हे सर्व शास्त्रज्ञ मार्गदर्शन करणार आहेत, तर तिसऱ्या दिवशी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली पारितोषिक वितरण आणि सांगता समारंभ पार पडणार आहे.

या परिषदेमुळे शिवाजी विद्यापीठ रसायनशास्त्रातील आंतरराष्ट्रीय घडामोडींवर चांगला प्रभाव टाकून जागतिक स्तरावर नाव उंचावेल. तसेच नवनवीन विचारातून विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीला चालना मिळेल, असा विश्वास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केला. पत्रकार परिषदेला विभागप्रमुख जी. एस. गोकावी, ए. व्ही. घुले, एस. डी. डेळेकर, पी. व्ही. अनभुले, के. एम. गरडकर, आर. एस. साळुंखे, डॉ. एस. ए. संकपाळ उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
24 JAN 2018 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# बापूंचे स्वातंत्र्यलढ्यातील नेतृत्व वैशिष्ट्यपूर्ण

## डॉ. अरुण भोसले : डॉ. जी. डी. बापू लाड व्याख्यानमाला

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २३ : डॉ. जी. डी. बापू लाड यांनी समाजपरिवर्तन आणि सामाजिक प्रबोधनासाठी संपूर्ण हयात वेचली. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीत विविध स्तरांवर उभारलेल्या नेतृत्वांत त्यांचे नेतृत्व वैशिष्ट्यपूर्ण होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अरुण भोसले यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्रातर्फे क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड व्याख्यानमालेअंतर्गत 'जी. डी. बापू लाड : स्वातंत्र्य संग्रामातील एक झुंजार नेतृत्व' विषयावर व्याख्यानमालेत ते बोलत होते. मानव्यविद्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते. याप्रसंगी अरुण अण्णा लाड उपस्थित होते.

डॉ. भोसले म्हणाले, "प्रतिसरकारच्या चळवळीत डॉ. लाड यांची मध्यवर्ती भूमिका होती. सामान्य शेतकरी कुटुंबामध्ये जन्मलेले, वडिलांचे छत्र हरपलेले



**कोल्हापूर : डॉ. जी. डी. बापू लाड व्याख्यानमालेत बोलताना डॉ. अरुण भोसले.**

जी. डी. बापू बलाढ्य कर्तृत्वाने पुढे कष्टकरी, गरीब जनतेचे आधारवड बनले. एस. एम. लोहियांच्या संपर्कात आल्यानंतर पुढे त्यांनी राष्ट्रीय सेवादलाची स्थापना केली. बापूंचे कार्यक्षेत्र सातारा जिल्ह्यामध्ये राहिले. याच काळात क्रांतिसिंह नाना पाटील यांनी लोकजागृतीचे मोठे कार्य केले. शेतकऱ्यांचे जीवन आनंदी करण्यासाठी, सामान्य माणसाच्या जगण्याला सुरक्षितता देण्यासाठी ब्रिटिश सरकार हद्दपार झाले पाहिजे, यासाठी त्यांनी आपल्या तुफान सेनेच्या मदतीने गावोगावी लढा उभा केला. अंतर्गत वाद, दहशत, जुलूम मिटवून अनेकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले."

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, "ब्रिटिश हस्तकांपासून मुक्ती मिळवण्यासाठी बापूंनी प्रखरतेने लढा दिला. गरीब, शेतमजूर यांच्यावरील अन्याय निवारणासाठी बापूंना अनेकवेळा संघर्ष करावा लागला." गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. शीतल भोसले यांनी सूत्रसंचालन केले. या वेळी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, डॉ. एस. एन. पवार, प्राचार्य बी. एस. पवार, प्राचार्य य. ना. कदम, प्राचार्य प्रकाश कुंभार, प्राचार्य नलवडे, प्राचार्य आर. एच. पठाण, डॉ. नंदा पारेकर, दशरथ पारेकर, व्ही. वाय. पाटील, सुरेश शिपूरकर, अवनिश पाटील यांच्यासह विविध अधिविभागांतील विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नेहा वाडेकर यांनी आभार मानले.

24 JAN 2018

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**अरुण भोसले :** शिवाजी विद्यापीठात गांधी अभ्यास केंद्रातर्फे व्याख्यानाचे आयोजन

# जी. डी. बापूंकडून हयातभर सामाजिक प्रबोधन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** डॉ. जी. डी. बापू लाड यांनी समाजपरिवर्तन आणि सामाजिक प्रबोधनासाठी संपूर्ण हयात वेचली. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीत विविध स्तरांवर उभारलेल्या नेतृत्वात डॉ. लाड यांचे नेतृत्व वैशिष्ट्यपूर्ण होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अरुण भोसले यांनी मंगळवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्रातर्फे आयोजित क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड व्याख्यानमालेअंतर्गत ते बोलत होते. त्यांच्या व्याख्यानाचा विषय 'जी. डी. बापू लाड : स्वातंत्र्यसंग्रामातील एक झुंजार नेतृत्व' असा होता. विद्यापीठाच्या मानव्य विद्या सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, तर क्रांती सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अरुणअण्णा लाड प्रमुख उपस्थित होते. डॉ. भोसले म्हणाले, भारतीय स्वातंत्र्यचळवळीचे सूत्र सुरुवातीला प्रामुख्याने उच्चविद्याविभूषित लोकांकडे होते. त्यात स्थित्यंतर आले ते महात्मा गांधी स्वातंत्र्यचळवळीत उतरल्यानंतर. सन १९४२चे 'भारत छोडो आंदोलन' मोठे होते. देशात चार ते पाच ठिकाणी प्रतिसरकारची स्थापना झाली. प्रामुख्याने उत्तर प्रदेश व महाराष्ट्रातील सातारा या ठिकाणी प्रतिसरकार जोरात होते. प्रतिसरकारच्या चळवळीत डॉ. लाड यांची मध्यवर्ती भूमिका होती. ते आपल्या बलाढ्य कर्तृत्वाने पुढे कष्टकरी, गरीब जनतेचे आधारवड बनले. प्र-कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, ब्रिटिश हस्तकांपासून मुक्ती मिळविण्यासाठी बापूंनी प्रखरतेने लढा दिला. कार्यक्रमास डॉ. डी. आर. मोरे, एस. एन. पवार, बी. एस. पवार, य. ना. कदम, प्रकाश कुंभार, आर. एच. पठाण, नंदा पारेकर, दशरथ पारेकर, व्ही. वाय. पाटील, सुरेश शिपूरकर, अवनिश पाटील उपस्थित होते. गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. शीतल भोसले यांनी सूत्रसंचालन केले. नेहा वाडेकर यांनी आभार मानले.



**शिवाजी विद्यापीठात मंगळवारी डॉ. जी. डी. बापू लाड व्याख्यानमालेत डॉ. अरुण भोसले यांनी विचार मांडले. यावेळी डावीकडून अरुणआण्णा लाड, डी. टी. शिर्के, भारती पाटील उपस्थित होते.**

## गावागावांत लढा

शेतकऱ्यांचे जीवन आनंदी करणे, सामान्य माणसाच्या जगण्याला सुरक्षितता देण्याकरिता ब्रिटिश सरकार हद्दपार करण्यासाठी जी. डी. बापूंनी आपल्या तुफान सेनेच्या मदतीने गावोगावी लढा उभा केला. त्यांनी उत्तरायुष्यात शोषणमुक्त समाजनिर्मितीचा ध्यास घेतला, असे डॉ. भोसले यांनी सांगितले.

24 JAN 2018
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्टुडंट कौन्सिलची आज निवडणूक

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अधिविभाग व महाविद्यालय पातळीवरील शैक्षणिक वर्ष २०१७-१८मधील स्टुडंट कौन्सिलची निवडणूक मेरीटनुसार २४ जानेवारी रोजी होणार आहे. ही निवडणूक विद्यापीठ अधिविभागासह विद्यापीठ परिक्षेत्रातील २८० महाविद्यालयात होणार आहे. विद्यापीठ पातळीवरील स्टुडंट कौन्सिलच्या निवडणूकीची प्रशासकीय पातळीवर पूर्ण तयारी केली आहे, अशी माहिती विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी दिली.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ ची अंमलबजावणी १ मार्चपासून सर्वच विद्यापीठांनी केली आहे. त्यामुळे २०१६ च्या कायद्यात बदल करत 'स्टुडंट कौन्सिलच्या निवडणुका' होणार आहेत. या निवडणूकीनंतर विद्यापीठ पातळीवरील सचिव व सभापतीपदाच्या निवडणूक प्रक्रियेला १ फेब्रुवारीपासून प्रारंभ होणार आहे. तर २७ फेब्रुवारीला विद्यापीठ पातळीवरील सभापती व सचिव पदाची निवडणूक होणार आहे. विद्यापीठ पातळीवरील स्टुडंट कौन्सिल प्रतिनिधींची २४ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता राजर्षी शाहू सभागृहात बैठक होणार आहे. या बैठकीत प्रतिनिधींचे अर्ज भरून घतले जातील. त्यानंतर अर्जांची छाननी करून पुढील निवडणूक प्रक्रिया पूर्ण केली जाईल, असेही डॉ. गुरव यांनी सांगितले.

**विद्यापीठ अधिविभाग स्तरावरील स्टुडंट कौन्सिल निवडणूक कार्यक्रम**

- १ फेब्रुवारी विद्यापीठ पातळीवरील सचिवपदासाठी अर्ज दाखल करावयाचा आहे.
- २ फेब्रुवारी रोजी 'स्टुडंट कौन्सिलच्या निवडणूक'' निवड समितीची बैठक
- ५ फेब्रुवारी कुलगुरू नियुक्त विद्यार्थ्यांची नावे जाहीर होणार
- विद्यापीठ पातळीवरील सचिव पदासाठीच्या स्टुडंट कौन्सिलच्या निवडणूकीसाठी नोटीस दिली जाणार.
- २७ फेब्रुवारी विद्यापीठ पातळीवरील अध्यक्ष व सचिवपदासाठी निवडणुक.

जनसंपर्क कक्ष


24 JAN 2018 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाविद्यालयीन जीएस निवड आज

कोल्हापूर, ता. २३ : शिवाजी विद्यापीठातर्फे महाविद्यालयीन व विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी मंडळाची निवड उद्या (ता. २४) होणार आहे.


जीएस (महाविद्यालयीन सचिव), यूआर (विद्यापीठ प्रतिनिधी) व एलआर (महिला प्रतिनिधी) पदांकरिता ही प्रक्रिया घेतली जाईल. निवड प्रक्रिया गुणवत्तेवर होणार आहे. तीन वर्षांनंतर ही निवड प्रक्रिया होत आहे.

विद्यापीठाच्या कायद्यानुसार सचिवपदासाठी ही निवड प्रक्रिया होत आहे. काही महाविद्यालयांत विद्यापीठ व महिला प्रतिनिधीपदाची निवड केली जाते. त्यामुळे या पदावर निवड होण्यासाठी विद्यार्थ्यांकडून जोरदार तयार केली जाईल. राजकीय नेत्यांच्या वारसदारांचा निवडीत हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रत्येक महाविद्यालयावर त्या परिसरातील तालमींमध्ये वर्चस्व गाजविण्याची ईर्षा असते. त्याची प्रचीतीही निवडीतून दिसण्याची शक्यता आहे. विद्यापीठाच्या अंतर्गत २८० महाविद्यालये आहेत. विद्यापीठात ४६ विभाग आहेत. त्या प्रत्येकाच्या एका सचिवाची (जीएस) निवड करण्यात येणार आहे. सकाळी नऊ ते दुपारी एक या वेळेत ही निवड प्रक्रिया पूर्ण होईल.



24 JAN 2018 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : अखिल भारतीय विद्यापीठ तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झालेला शिवाजी विद्यापीठाचा संघ. शेजारी डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. धनंजय पाटील.

# तलवारबाजी संघाची निवड

कोल्हापूर, ता. २३ : अमृतसर येथील गुरूनानक देव विद्यापीठात होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तलवारबाजी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यपीठाच्या संघाची निवड नुकतीच झाली. संघात अक्षय देशमुख, मोरेश्वर पाटील, प्रतिक जाधव, ओंकार पाटील, प्रतिक संकपाळ, राम यादव, यश कोळी यांचा समावेश आहे. त्यांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. पी. टी. गायकवाड, प्रा. राहुल मगदूम, डॉ. धनंजय पाटील, विक्रम नांगरे-पाटील, गॅब्रियल रॉड्रीक्स, प्रफुल्ल धुमाळ यांचे प्रोत्साहन मिळाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2018
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाची उपांत्य फेरीत धडक

**कोल्हापूर :** अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मुलांच्या खो-खो स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाने नांदेडच्या स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठ संघाचा केवळ एक गुणांनी पराभव करीत उपांत्य फेरी गाठली. बुधवारी (दि. २४) शिवाजी विद्यापीठ संघाचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाबरोबर उपांत्य सामना होईल. शिवाजी विद्यापीठ व स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठ या संघांमध्ये झालेला उपांत्यपूर्व सामना चुरशीने खेळला गेला. सामन्याच्या पहिल्या डावात शिवाजी विद्यापीठाने नांदेड विद्यापीठाचे ६ गडी बाद केले. यानंतर नांदेड विद्यापीठाने शिवाजी विद्यापीठाचे ७ गडीच बाद करुन १ गुणांनी आघाडी घेतली. दुसऱ्या डावात मात्र शिवाजी विद्यापीठाने आक्रमक चाली करत नांदेड विद्यापीठाचे ८ गडी बाद करण्यात यश मिळवले. यानंतर नांदेड विद्यापीठाला विजयासाठी शिवाजी विद्यापीठाचे ७ गडी बाद करणे आवश्यक होते. पण केवळ सहाच गडी बाद करता आले.